(6)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४१, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२०२१३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/२०१०/सभा-११७/(९५)/आ.४ दिनांक : ६.७.२०१०

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय : दि.१३.५.२०१० रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११७ व्या सभेचे इतिवृत्त.**

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुरुवार दि.१३.५.२०१० रोजी झालेल्या ११७ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपली विश्वासू,
उ.प्र.महाजन
(उ.प्र.महाजन)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : ११७ व्या सभेचे इतिवृत्त.

प्रत :-

१ वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र.३ व ४ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. अधीक्षक अभियंता, मुख्यालय, म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ६ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

३. उप मुख्य लेखा अधि. (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

४. आस्थापना अधिकारी (द.), म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या कक्षाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रम बाब क्र. ५ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

५. कायदा व कामगार अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

६. प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

७. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कार्यासन अधि./कक्ष अधिकारी यांच्या माहितीसाठी.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११७ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११७ वी सभा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक १३/५/२०१० रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभोग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य वित्त विभाग मंत्रालय, मुंबई-३२
४. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,तथा प्राधिकरणाचे सदस्यंयांच्या वतीने सौ.चारुशिला तांबेकर,उपसचिव सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
५. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री.हेमंत चं. लांडगे, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, ठाणे
२. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, पुणे
३. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नाशिक
४. श्री.व्ही.एन. राठोड, मुख्य अभियंता, म.जी.प्रा.प्रादे. विभाग, नागपूर.
५. श्री.प्र.वा.पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
७. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.
८. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
९. श्री.सु.रा. भोसले, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११६ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक ३० मार्च २०१० रोजी संपन्न झालेल्या ११६ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११६ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक ३० मार्च २०१० रोजी संपन्न झालेल्या ११६ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. कोणत्याही सदस्याचे आक्षेप नसल्याने केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मान्यता मिळणेबाबत ऊहापोह केला. त्यावर मा.मंत्री,तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांनी शिल्लक निधी, दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीमध्ये गुंतवावा तसेच सिंकींग फंड, पेन्शन फंड इत्यादी गुंतवणुक ही करण्यात यावी असे सुचविले. म.जी.प्रा.च्या गुंतवणुकीबाबत प्रथमतः बँका, संस्था यांच्या प्रतिनिधीशी प्रत्यक्षात चर्चा करुन चढाओढीने गुंतवणूक करण्याचा कसोशीने प्रयत्न करावा म्हणजे जास्त व्याज दर मिळू शकेल असे निर्देश दिले.

याबाबत चर्चा करुन दिनांक १६/३/२०१० ते १०/५/२०१० पर्यंत अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.४: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००७-२००८ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल.**

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सन २००७-२००८ या वार्षिक लेखा परिक्षणा विषयी संचालक मंडळास अवगत केले. यावर मा.मंत्री,तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष,यांनी महालेखाकार मुंबई यांच्या लेखा परिक्षण अहवालामध्ये म.जी.प्रा.बाबत काही आक्षेपार्ह काही मुद्दे उपस्थित केले आहेत काय अशी विचारणा केली. यावर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

वार्षिक लेखा परिक्षण अहवालामध्ये कोणतेही आक्षेपार्ह मुद्दे नमूद केलेले नाहीत, असे सूचित केले. यावर मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्वच्छता विभाग यांनी महालेखाकार मुंबई यांनी सन २००७-२००८ या वर्षातील लेखा परिक्षण अहवालातील मुद्दा क्र. १.३ ,१.५, २.२, २.६ मधील आक्षेपांकडे लक्ष वेधून याबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे असे सूचित केले. याबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी चर्चा केली. मुद्दा क्र. १.३ मधील वसुलीबाबत सद्यस्थिती पुढील बैठकीत ठेवावी असे प्रधान सचिव यांनी सुचविले. तसेच मुद्दा क्र.२.६ विषयी चर्चा करतांना (Depreciation Fund, Pension Fund, Sinking Fund) या निधीमध्ये जे कमी अंशदान करण्यात येते ते पूर्णपणे करण्यात यावे असे प्रधान सचिव यांनी सुचविले.

अंतिमत: सदर कार्यक्रम बाबीबाबत चर्चा होऊन कार्यक्रम बाबीसंदर्भातील खुलासे मा.प्रधान सचिव यांचेकडे सादर करावा असे ठरले.

ठराव :- सद्यस्थितीत प्राधिकरणाच्या सन २००७-२००८ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २००७-२००८ चे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्या करिता सदरील अहवाल शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य पालक तत्वाखाली दोन स्वतंत्र उप कंपन्यांची निर्मिती करण्याबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य पालक तत्वाखाली दोन स्वतंत्र उप कंपन्या करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सदस्य सचिव,यांनी संचालक मंडळास अवगत केले. यावर मा.मंत्री महोदय ,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी असे सूचित केले की, आज दिनांक १३/५/२०१० रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पुनर्गठन न करता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अस्तित्वात ठेवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे सोपविल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अशी कामे करण्यास सक्षम आहे. करिता पुनर्गठन करण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे.

मा.अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी म.जी.प्रा.चे बळकटीकरण करण्यासाठी तसेच म.जी.प्रा.चे पुनर्गठन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने क्रिसील या संस्थेची नेमणूक केली असून क्रिसील या संस्थेचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. क्रिसीलच्या अहवालानुसार म.जी.प्रा.चे पुनर्गठन करणे महत्वाचे आहे. क्रिसिलच्या अंदाजानुसार सेवानिवृत्ती वेतन व तदर्थ आर्थिक बाबींपोटी म.जी.प्रा.वर येणारे दायित्व रु. १४०० कोटी एवढे आहे. प्रस्तुत दायित्व म.जी.प्रा.च्या पुनर्गठणोत्तर स्थापित होणाऱ्या कंपन्यांवर अथवा मुख्य म.जी.प्रा.वर ठेवणे उचित ठरणार नाही. त्यामुळे या दायित्वाच्या पूर्ततेसाठी शासनाला म.जी.प्रा.ला मदत करावी लागेल. अशी मदत "निवृत्ती वेतन निधी" स्थापित करुन त्याद्वारे अथवा म.जी.प्रा.ला शासन हमीवर बाँड काढण्याची परवानगी देऊन करता येईल असेही क्रिसिलने सूचित केले. तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवरील देखभाल दुरुस्तीसाठी पुढील ५ वर्षासाठी कंपनी तोटयातच राहिल असे सूचित केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंता संघटना अथवा इतर संघटना व कर्मचाऱ्यांच्या खालील मुद्यांबाबत मा.मंत्री तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष, यांनी क्रिसील कंपनीकडून म.जी.प्रा.च्या पुनर्गठनाबाबतच्या अहवालासंबंधी प्रत्येक मुद्देनिहाय खुलासा करण्याबाबत सूचित केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पालकत्वाखाली खालील प्रमाणे कंपन्या करण्यात याव्यात. (अ) देखभाल दुरुस्ती कंपनी (ब) प्रकल्प व्यवस्थापन सेवा कंपनी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर आजमितीस नियमित आस्थापनेवर ४७८५ व रुपातंरीत आस्थापनेवर ३०८१ असे एकूण ७८६६ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचा-यापैकी देखभाल दुरुस्ती कंपनीमध्ये एकूण २१४५ व प्रकल्प व्यवस्थापन कंपनीमध्ये ३४८ अधिकारी /कर्मचारी कार्यरत राहतील व उर्वरित ५३७३ अधिकारी / कर्मचारी हे पुर्वीप्रमाणे मुख्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये राहतील . ज्या अधिकारी / कर्मचा-यांची सेवा त्या कंपनीकडे वर्ग करण्यात येईल त्यांचा संविधानिक दर्जा म.जी.प्रा.चेच कर्मचारी असाच राहणार असून त्यांना मिळणारे वेतन व भत्ते हे म.जी.प्रा.च्या अधिकारी कर्मचा-यांना मिळणा-या वेतनापेक्षा कमी असणार नाही.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

क्रिसील कंपनीच्या पदाधिका-यांनी तसेच मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि.यांनी म.जी.प्रा.चे पुनर्गठन केल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सक्षमतेने कामे होतील असे सूचित केले. मा.मंत्री तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष यांनी यानुषंगाने असे सांगितले की, संघटनांना विश्वासात घेवूनच पुढील पाऊले उचलली जातील.

. मा.प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा म.जी.प्रा.चे सदस्य यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुनर्गठनाबद्दलचा मुद्दा उपस्थित करुन उपरोक्त देखभाल दुरुस्ती कंपनी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा कंपनी यांना आर्थिक सहाय्याबाबत विचारणा केली. निवृत्ती वेतन धारकांसाठी Pension Fund स्थापन करुन रु. १४०० कोटी इतक्या निधीची तरतूद Plan करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**ठराव :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पालकत्वाखाली व शासनाच्या अधिपत्याखाली "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" सेवेसाठी अन्य पाणी पुरवठा मलनि:सारण योजनेच्या "देखभाल व दुरुस्ती " संबंधीत कामासाठी म.जी.प्रा. अंतर्गत दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली असून पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव शासनाला सादर करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ६ महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे सद्यस्थिती बाबतचे सादरीकरण.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आज महाराष्ट्र राज्यामध्ये एकंदर १०१२ प्रा.पा.पु. योजना तसेच ७४१९ गावे व ४१४१ वाडया अशा ११५६० वाडया वस्त्यांना प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमधून १,३८,७५,००० लोकांना पाणी पुरवठा केला जातो. वरील १०१२ प्रा.पा.पु. योजनांपैकी १४३ योजना सध्या बंद आहेत सदर योजनेचे पुनर्जिवीत करण्यासाठी ७१.१४ कोटी निधी लागणार आहे. त्यापैकी ५९ प्रा.पा.पु. योजनांना वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे सदर योजना बंद आहेत. सदर योजनेची वीज देयकांची थकबाकी रु. ३.१७ कोटी व त्यावरील व्याज १.३३ कोटी असा आहे. वीज थकबाकीमुळे बंद असलेल्या ५९ योजनांचे पुनर्जिवन करावयाचे झाल्यास रु.५०.२३ कोटी निधीची आवश्यकता आहे. रु. ५०.२३ कोटी निधीची तरतूद झाल्यास सर्व ५९ योजनांचे पुनर्जिवन करता येईल त्यामुळे ८.८१ लाख लोकांना पाणी पुरवठयाचा लाभ होईल असे सदस्य सचिव यांनी

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

संचालक मंडळाच्या निर्देशनास आणून दिले. याबाबत मा. मंत्री तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष यांनी असे सूचित केले की, ज्या योजनांना निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल त्या योजना सुरळीतपणे चालणे आवश्यक आहे अन्यथा केलेला खर्च वाया जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच अशा योजनांबाबत सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,व अधीक्षक अभियंता यांनी संबंधीत योजनेबाबत अहवाल सादर करावा व योजना व्यवस्थित चालेल याची हमी घेण्यात यावी असेही निर्देश दिले.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.